## प्रेस नोट दि.२१/०५/२०१९

## कोंढवा पो स्टे पुणे शहर

## घरफोडी करणाा अट्टल चोरास त्याचे साथिदारासह कोंढवा पोलीसांनी केले जेरबंद

फिर्यादी अनिल भगवान मनशारामानी वय.४०वर्षे व्यवसाय.व्यापार रा.फलॅट नंबर ए/१०६ कंचन सनरत्न हौसिंग सोसायटी,निंबाळकर वस्ती,येवलेवाडी पुणे यांचे फिर्यादीवरुन कोंढवा पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजि.नंबर ४१५/२०१९ भादवि कलम ४५४,४५७,३८० प्रमाणे घरफोडीचा गुन्हा दाखल करणेत आलेला होता.

**मा.पोलीस आयुक्त सो पुणे शहर यांनी पुणे शहरात थर्ड आय प्रोजेक्ट** हा संपुर्ण पुणे शहरातील सी.सी.टी.व्ही. कॅमेरे एकत्रीत संकलित करण्याचा प्रोजेक्ट (उपक्रम) राबविलेला आहे. त्यामुळे पुणे शहरातील मुख्य रस्ते,सोसायटी मार्गे, अंतर्गत रस्ते या ठिकाणावर कोणकोणत्या ठिकाणी सी.सी.टी.व्ही. कॅमेरे आहेत. याबाबतची अदयावत माहिती तयार करणेत आलेली आहे.

कोंढवा पोलीस स्टेशन कडील सबंधीत गुन्हा घडल्यानंतर श्री. मिलींद पाटील,सहा पोलीस आयुक्त, वानवडी विभाग पुणे शहर व श्री.अनिल पाटील वरिष्ठ पोलीस निरीक्षक कोंढवा पोलीस स्टेशन पुणे व श्री. महादेव कुंभार, पोलीस निरीक्षक गुन्हे, कोंढवा पोलीस स्टेशन पुणे यांनी तात्काळ घटनास्थळास भेट देवुन थर्ड आय प्रोजेक्ट प्रमाणे संकलीत केलेले सी.सी.टी.व्ही. कॅमेरे तपासुन गुन्हा उघडकीस आनणेबाबत तपास पथकातील अधिकारी व कर्मचारी यांना सुचना देवुन मार्गदर्शन केले होते.

चोरी झालेल्या कंचन सनरत्न हौसिंग सोसायटी येथील घटनास्थळावरील सी.सी.टी.व्ही. फुटेजची पाहणी केली असता,एक अनोळखी इसम सदर सोसायटीत संशयितरित्या फिरताना दिसला.त्यावरुन पोलीस नाईक अमित साळुंके व पोलीस शिपाई जगदीश पाटील यांनी सोसायटीमधील कॅमेरे व सोसायटीकडे येणाऱ्या मार्गावरील कॅमेरांची बारकाईने पाहणी केली असता,सोसायटीमध्ये फिरत असलेला संशयित हा एका रिक्षामधुन येत असल्याचे दिसल्याने त्या रिक्षाचा सी.सी.टी.व्ही. कॅमराद्वारे कौशल्यपुर्वक पाठलाग केला तेव्हा त्या रिक्षाचा क्रमांक एम.एच.१२.सी.टी. ७१२१ हा असुन त्या रिक्षातुनच संशयित चोर आला असल्याबाबत फुटेज प्राप्त झाल्याने सदर रिक्षा मालक अब्बास सिकंदर सय्यद रा.लोहियानगर ५२१ गंजपेठ पुणे यांचेकउे चौकशी केली असता,त्यांनी सांगितले की, मी इसम सिकंदर इब्राहीम शेख रा. दलाल चौक घोरपडी पेठ पुणे यांना सदरची रिक्षा करारावर चालविणे करीता दिली आहे. म्हणुन सिकंदर शेख याचा शोध घेवुन त्याचेकडे नमुद रिक्षाबाबत चौकशी करता त्यांनी सदरची रिक्षा अमिर रफिक शेख,रा.ग्रिनपार्क गल्ली कोढवा-खुर्द.पुणे यास शिफ्टने चालविणेस दिली असल्याचे सांगितले. म्हणुन रिक्षा चालक अमिर शेख यास ताब्यात घेवुन त्याचेकडे सखोल चौकशी करता,त्याने त्याचा साथिदार मुस्तफा शकील अन्सारी,रा.नवाजीशपार्क कोंढवा खुर्द,पुणे याचेसह त्याचे रिक्षातुन सदर ठिकाणी जावुन चोरी केली असल्याचे कबुल केले.

मुस्तफा शकील अन्सारी हा पुणे शहर पोलीसांचे रेकॉर्डवरील घरफोडी चोरी करणारा अट्टल गुन्हेगार असल्याने त्यास नवाजिश पार्क येथुन ताब्यात घेतले आरोपी **१)** मुस्तफा शकील अन्सारी रा.नवाजीशपार्क कोंढवा खुा.पुणे **२)** अमिर रफिक शेख रा.स.नं.६/१ ग्रिनपार्क गल्ली नं.१ रुम नं.४० कोढवा खुा पुणे त्याचेकडे सखोल तपास करुन त्यांनी कोंढवा व वानवडी पोलीस स्टेशन हद्दीत एकुण ५ घरफोडी चोरी केलेले खालील गुन्हे उघडकीस आणले आहेत.

१) कोंढवा पोलीस स्टेशन गुन्हा रजि नंबर ४१५/२०१९ भादवि कलम ४५४,४५७,३८०
२) कोंढवा पोलीस स्टेशन गुन्हा रजि नंबर २५९/२०१९ भादवि कलम ४५४,३८०
३) कोंढवा पोलीस स्टेशन गुन्हा रजि नंबर ३६४/२०१९ भादवि कलम ४५४,३८०
४) वानवडी पोलीस स्टेशन गुन्हा रजि नंबर २५४/२०१९ भादवि कलम ४५४,३८०
५) वानवडी पोलीस स्टेशन गुन्हा रजि नंबर १९४/२०१९ भादवि कलम ४५४,३८०

वरील नमुद गुन्हयांमध्ये किं.रु. ६,५०,०००/- चे सोने चांदीचे दागिने व गुन्हयात वापरलेली किं.रु. ४५,०००/- ची रिक्षा असा एकुण ६,९५,०००/- रु. चा मुद्देमाल तसेच गुन्हा करण्याकरीता वापरलेले हत्यारे जप्त

करणेत आलेली आहे. आरोपी मुस्तफा अन्सारी याचेविरुध्द पुणे शहरात वेगवेगळया पोलीस स्टेशनला एकुण १६ घरफोडीचे गुन्हे दाखल आहेत.

**सदरची कामगिरी मा.श्री.सुनिल फुलारी सो,मा.अपर पोलीस आयुक्त,पुर्व प्रादेशिक विभाग पुणे शहर,मा. श्री.प्रकाश गायकवाड सो.पोलीस उप आयुक्त परिमंडळ – ५,मा.मिलींद पाटील सो.सहा पोलीस आयुक्त,वानवडी विभाग पुणे शहर,श्री.अनिल पाटील,वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्री. महादेव कुंभार, पोलीस निरी.गुन्हे यांचे सुचना व मार्गदर्शनाखाली सहा.पोलीस निरी.चेतन मोरे,संतोष शिंदे,पोलीस हवालदार राजस शेख,अमित साळुंके,जगदीश पाटील,योगेश कुंभार,संजीव कळंबे,सुरेंद्र कोळगे,किरण मोरे,सुशिल धिवार,निलेश वणवे,उमाकांत स्वामी,अजिम शेख,इकबाल शेख,विलास तोगे,विलास ढोले यांचे पथकाने केली असुन अधिक तपास पोलीस उप निरी. संतोष शिंदे हे करीत आहेत.**

( अनिल पाटील )
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
कोंढवा पोलीस स्टेशन,पुणे शहर